# महाविद्यालय विकास समिती सहविचार सभा वृत्तांत

दि. ०७/०३/२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता महविद्यालय विकास समितीची सहविचार सभा मा. डॉ. विजय नारखेडे, सहसंचालक, कोकण विभाग, पनवेल यांच्या अध्यक्षतेखाली व मा. सचिव डॉ. रमा भोसले यांच्या उपस्थितीत सेमिनार कक्षात आयोजित करण्यात आली. सभेच्या सुरुवातीला डॉ. यु. एम. डोणे यांनी उपस्थित सर्व समिती सदस्यांचे स्वागत केले. तसेच नवनियुक्त सहसंचालक मा. डॉ. विजय नारखेडे सर यांचे मा. प्राचार्यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. तसेच प्रत्येकाने आपला परिचय करून दिला. सभेमध्ये खालील विषयांवर चर्चा करण्यात आली.

**१) सभेच्या सुरुवातीला मागील सभेचा वृत्तांत वाचून कायम करण्यात आला.**

**२) वसतीगृह नूतनीकरणाचा आढावा** – सध्या वसतीगृह नूतनीकरणाचे जे काम झालेले आहे त्यासाठीचा पूर्ण खर्च हा PWD मार्फत झालेला आहे. पण सध्या निधी अभावी सदर नूतनीकरणाचे काम स्थगित आहे, असे मा. प्राचार्यांनी सूचित केले. वसतीगृहातील ४ खोल्यांचे विद्युतीकरण व नूतनीकरणाचे काम पूर्ण झाले तर मुलांची राहण्याची व्यवस्था होईल. तसेच वसतीगृहात सुरक्षितता व स्वच्छता राहील असे मा. प्राचार्यांनी सूचित केले. मा. अध्यक्षांनी PWD ला महाविद्यालयाने पुन्हा पत्र देऊन नूतनीकरणाचे कामकाज पूर्ण करण्यास सांगावे असे सूचित केले. वसतीगृह नूतनीकरणाचे कामकाज पूर्ण होण्याच्या दृष्टीने वारंवार पाठपुरावा करावा असे मा. अध्यक्षांनी सूचित केले.

**३) प्रशासकीय कामकाज योग्य पद्धतीने करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळाची मागणी** – कार्यालयामध्ये सध्या ४ पदे भरलेली आहेत असे दिसते. पण हे लोक नेहमी अनुपस्थित असतात. त्यामुळे विद्यार्थी, पालक आणि प्राध्यापक यांना अनेक समस्या येतात. त्यामुळे प्रशासनाला अनेक अडचणींना सामोरे जावे लागते असे मा. प्राचार्यांनी सूचित केले. असलेले मनुष्यबळ हे अकुशल असून त्यांनी कुशल मनुष्यबळाची मागणी केली. सध्या प्रशासकीय कामकाज चालवण्याच्या दृष्टीने एक लिपिक देयके व बजेटसाठी सहसंचालक कार्यालयाकडून उपलब्ध करून द्यावा असे मा. प्राचार्यांनी सूचित केले. यावर मा. अध्यक्षांनी एक लिपिक या कामासाठी पाठवला जाईल असे जाहीर केले. तसेच सध्या महाविद्यालयात असलेला कनिष्ठ लिपीक श्री. अंकुश चव्हाण यांच्या कौटुंबिक समस्येवर चर्चा झाली. त्यामुळे प्रशासकीय कामकाजात येणाऱ्या अडचणी यावर मा. प्राचार्यांनी चर्चा केली.

**४) मुलींच्या वसतीगृह नूतनीकरणासाठी DPDC साठी प्रस्ताव सादर करणे** – मुलींच्या वसतीगृह नूतनीकरणासाठी DPDC मधून बजेट मिळते यासाठी मा. प्राचार्यांनी DPDC कार्यालयाला प्रत्यक्ष भेटून चर्चा करून माहिती घेतलेली आहे. परंतु DPDC कडून याबाबत कोणतेही सहकार्य मिळत नाही असे मा. प्राचार्यांनी सूचित केले. यासाठी पुढच्या आर्थिक वर्षात DPDC साठी पुन्हा प्रस्ताव सादर करू असे मा. अध्यक्षांनी सूचित केले.

**५) स्टेशनरी खर्चाचा प्रस्ताव मंजुरी** – सध्या स्टेशनरीचे ५० व १०० च्या संख्येत दरपत्रक प्राप्त झाले असून त्यावर दराच्या संदर्भात सदस्यांमध्ये चर्चा झाली. १०० च्या संख्येत स्टेशनरी घेतली तर ते अधिक सोयीचे होईल असे मा. प्राचार्य व अध्यक्ष यांनी सूचित केले. मागील वर्षाचे दरपत्रक आणि या वर्षाचे दरपत्रक यामध्ये किमतीसंदर्भात तफावत असेल तर वाटाघाटी करून पुन्हा दरपत्रके मागवावी व पुढील कार्यवाही करावी व त्याच्या संदर्भात नोंदी ठेवाव्यात असे मा. अध्यक्ष यांनी सूचित केले.

Scanned with OKEN Scanner

६) Assignement Google Classroom प्रस्ताव मंजुरी – NEP 2020 अंतर्गत अभ्यासक्रमातील Assignement किंवा स्वाध्याय हे Google Classroom द्वारे घ्यावे असे सूचित केलेले आहे यासाठी प्रत्येक प्राध्यापकाने Google Classroom तयार करून आपल्या अभ्यासक्रमाच्या Assignement त्यावर घ्याव्यात असे मा. प्राचार्यांनी सांगितले. सध्या महाविद्यालयात smart board, smart classroom आहे त्याचा वापर विद्यार्थी करतात असे मा. प्राचार्यांनी सूचित केले. Development of Smartclass rrom साठी DPDC अंतर्गत निधी मागवावा असे मा. प्राचार्यांनी सूचित केले.

**७) ऐनवेळचे विषय –** १) महाविद्यालयाला PM USHA योजनेअंतर्गत निधी प्राप्त व्हावा याविषयी मा. प्राचार्यांनी चर्चा केली.

२) महाविद्यालयाला आवश्यक असणाऱ्या इतर जडवस्तू खरेदी करण्यासाठी DPDC कडे प्रस्ताव पाठवावा असे मा. अध्यक्षांनी सूचित केले.

३) प्रशासकीय कामकाज योग्य पद्धतीने होण्यासाठी सद्यस्थितीत महाविद्यालयातील कार्यालयामध्ये ५० किंवा २५ टक्के या प्रमाणात सहसंचालक कार्यालयाकडून मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे असे प्राध्यापक डॉ. बी. जी. खाडे यांनी सूचित केले.

४) महाविद्यालयातील सद्यस्थितीत असलेल्या अकुशल व वारंवार अनुपस्थित असलेल्या मनुष्यबळामुळे महाविद्यालयास विद्यार्थी प्रवेश, MIS, AISHE, Scholarship, Budget इत्यादी अनेक समस्यांना सामोरे जावे लागते यावर मा. प्राचार्यांनी चर्चा केली व यासाठी सहसंचालक कार्यालयाकडून एका लिपिकाची मागणी तात्पुरत्या स्वरुपात करण्याविषयी मा. प्राचार्यांनी सुचीत केले.

५) स्वीय प्रपंची खात्याचे अंदाजपत्रक सादर करणेबाबत संचालनालयाकडून सूचना प्राप्त झालेली आहे. तरी विहित वेळेत लिपिकाकडून PLA अंदाजपत्रक तयार करून मा. सहसंचालकांच्या स्वाक्षरीसह ते लवकर सादर करण्याची सूचना मा. सहसंचालकांनी दिली.

६) विद्यार्थी प्रतिनिधी श्री. प्रतिक पवार यांनी शाळांच्या वेळांबाबत समस्या व्यक्त केली. त्यावेळी मा. प्राचार्यांनी आंतरवासिता उपक्रमासाठी शाळांनी एका वेळेला एकाच महाविद्यालयाला परवानगी द्यावी. इतर महाविद्यालयांना नियोजनानुसार वेळ द्यावा अशी शाळांना विनंती केली तर आंतरवासिता उपक्रमाबाबत विद्यार्थ्यांना अडचणी निर्माण होणार नाहीत असे सूचित केले. मुख्याध्यापक बैठकी मध्ये याबाबत चर्चा व्हावी असेही त्यांनी सूचित केले.

७) कोणत्याही सहविचार सभेसाठी एखादा सदस्य तीन वेळा अनुपस्थित असेल तर सदर सदस्य बदलावा असे मा. अध्यक्षांनी सूचित केले.

सभेच्या शेवटी डॉ. प्रियांका सुभेदार यांनी मा. सहसंचालक डॉ. विजय नारखेडे सर यांचे महाविद्यालयाच्या वतीने आभार व्यक्त केले. तसेच समितीच्या सचिव प्राचार्य डॉ. रमा भोसले यांच्या प्रेरणेबद्दल त्यांचेही आभार व्यक्त केले. सहविचार सभेच्या चर्चेतील उपस्थित सन्माननीय सदस्य व प्राध्यापक या सर्वांचे आभार व्यक्त करून मा. अध्यक्षांच्या वतीने सदर सहविचार सभा संपन्न झाली असे डॉ. प्रियांका सुभेदार यांनी घोषित केले.

RBhosle

**Principal**

Government College of Education (C.T.E.)
Panvel, Dist, Raigad - 410 206.

Scanned with OKEN Scanner